Volume-2 (2021)
Issue-2 (September-2021)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173

# संतसाहित्यातील संत तुकारामांची काव्यशैली

**प्रा. नवाजी गेंदलाल घरत**
मनोहरभाई पटेल महाविद्यालय
साकोली जि. भंडारा

महाराष्ट्र ही संताची भूमी असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात तुकारामाचे अद्वितीय असे स्थान आहे. महाराष्ट्रातील मध्ययुगीन व अर्वाचीन संतानी व विचारवंतांनी तुकारामांचा मुक्तवाणीने गौरव केला आहे. वारकरी परंपरेत तुकारामांचे स्थान त्यांच्या शिष्या बहिणाबाईने प्रथम निश्‍चित केले. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला तर त्याचा कळस तुकारामांनी चढविला, असे तिने सार्थपणे म्हटले आहे. महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांमध्ये तुकाराम अत्यंत लाकप्रिय आहेत. या सर्वांनाच तुकारामांच्या अभंगातील काही म्हणी वा काही ओळी तरी तोंडपाठ असतातच. अनेकांना बरेच अभंग पाठ असतात. काही लोकांना तर जवळ जवळ सगळाच तुकाराम कंठस्थ असतो. मराठी लोकांचा महाराष्ट्रातील सर्व संतकवींमध्ये तुकारामावरच सर्वात जास्त लळा आहे. साहित्याच्या भारतीय व परदेशी अभ्यासकांनी तुकारामाचा मराठी भाषिक लोकांवर विलक्षण प्रभाव असल्याचे म्हटले आहे.'मध्ययुगीन साहित्याच्या आरंभ काळात वारकरी आणि महानुभाव या दोन पंथानी मराठी वाङ्मयाला समृद्ध केले. संतकवींनी मराठीला काव्यदृष्ट्या समृद्ध केले तर महानुभावांनी काव्याबरोबरच मराठी गद्यशैलीचा विकास घडवून आणला.'

## संत तुकारामांची काव्यशैली :—

तुकाराम हे जसे श्रेष्ठ संत होते, तसेच ते असामान्य प्रतिभेचे कवीही होते. संतत्व आणि कवित्व यांचा मनोहर संगम त्यांच्या व्यक्तित्वात दिसून येतो. तुकाराम हे निसर्गदत्त प्रतिभेचे श्रीमंत वारसदार होते. त्यांचे अभंग म्हणजे हृदयस्पर्शी भावगीते होत, असे कै. वा.ब. पटवर्धन यांना प्रथम जाणवले. तुकारामांच्या अभंगात उत्कट भक्तिभावनेचा आविष्कार आढळतो. त्यांनी काव्यनिर्मितीची प्रक्रियाही आपल्या काव्यातून सहजगत्या मांडली आहे. तुकोबा संतकवी होते म्हणून त्यांची महत्ता ही नैतिकतेच्या अंगाने महाकवींपेक्षा सरस ठरते. तुकोबा संत होते आणि संत असणे, हाच संतकाळाच्या काव्यनिर्मितीचा विशेष होता. संत असणारे जवळपास सर्वच कवी होते. अनेक जातीधर्माच्या संतानी सातशे वर्षाच्या काळात काव्यनिर्मिती केलेली आहे. काव्यनिर्मितीमागे संताची भूमिका ही समाजाला शहाणे करण्याची होती. जीवनाची अंतिम सत्ये अनुभवाच्या आधारे सांगण्याची होती.

तुकोबांच्या कवितेत लोकोद्धाराची प्रेरणा अत्यंत प्रबळ आहे. लोकांना जीवन जगण्याचे सत्याधिष्ठित ज्ञान देणे आणि भक्तीमहात्म्य लोकांच्या मनावर बिंबवून लोकांना एकूणच विश्वाचे जीवन सुखमय करण्यासाठी प्रवृत्त करणे, हाच तुकोबांच्या प्रबोधनाचा मुख्य हेतू होता. केवळ लोकांना ज्ञान द्यायचे आणि आपण मात्र कोरडे पाषाण असायचे, अशी कृतीहीन प्रबोधनाची धुरा तुकोबांनी कधीच आपल्या खांद्यावरून वाहिली नाही.

प्रबोधनाचे मुख्य माध्यम तर काव्यनिर्मिती हेच होते. काव्यातून लोकोद्धारासाठी कीर्तन करण्याची जुनी परंपरा होती. तुकोबांनी लोककल्याणासाठी कवितेचा उपयोग केला. आधी तुकोबांनी लोकांना देव लेखून त्यांना नमन केले. तुकोबांच्या काव्यात जननिष्ठ जाणीवेची शाश्वत अभिव्यक्ती आढळते. जनांविषयीचा कळवळा तुकोबांच्या शब्दाशब्दातून वाहतांना दिसतो. समाजात जगत असतांना रंजल्या गांजल्या पिडल्या लोकांचे दु:ख, तुकोबांना व्याकूळ करीत होते, अस्वस्थ करीत होते. लोकांना दु:खातून

बाहेर काढण्यासाठी, त्यांना जीवनसत्ये समजावून त्यांचे जीवन सुखमय करण्याचा ध्यास, तुकोबांनी घेतला होता.

तुकारामांच्या कवित्वाचा विचार करतांना तुकोबांना काव्याचा कोणता घटक महत्वाचा वाटत होता हे लक्ष्यात घ्यावे लागेल. **'आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने** ।' या अभंगात त्यांनी हा विचार मांडला आहे. **'आपुलीया बळे नाही बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ।'** या अभंगावरून मी माझ्या स्वत:च्या बळाने बोलत नाही, परमेश्वरच मला बोलते करीत आहे; ही परमेश्वराचीच वाणी आहे अशी त्यांची भूमिका आहे. थोडक्यात, आपले कवित्व ही ईश्वराचीच वाणी आहे असे त्यांना वाटते.

तुकोबांची कविता ही श्रेष्ठ भावकविता असून मानवी जीवनाच्या समग्रतेला आपल्या कवेत घेणारी आहे, असा दृष्टीकोन सर्वप्रथम वा.ल. कुलकर्णी आणि रा.ग. जाधव यांनी मांडला. तुकोबांच्या कवितेचे आकलन मांडणाऱ्या हया दोन्ही समीक्षकांनी अगदी निरपेक्षपणे आणि मनाच्या निखळ उत्स्फूर्तपणे तुकोबांच्या काव्य जाणिवेला स्पर्श केल्याचे जाणवते. तुकोबांच्या कवितेला जो खऱ्या अर्थाने भिडतो त्याला तुकोबांच्या कवितेतून विश्वव्यापक असे मानवी जीवनाचे सर्वव्यापी असे दर्शन घडते. आकलनात तो पूर्णपणे डुंबून, स्वत:च्याही जाणीवा व्यापक करून घेत असतो.

तुकारामांच्या कवितेची थोरवी वा. ल. कुलकर्णी यांनी 'मराठी कविता : जुनी आणि नवी' या ग्रंथात विस्ताराने वर्णन केलेली आहे. तुकोबांची कविता ही लोकधन आहे. तुकोबांच्या कवितेला सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला आहे. तुकारामांचा प्रत्येक अभंग ही एक स्वयंपूर्ण कलाकृती आहे. तुकोबांची प्रतिभा ही कितीही स्वैर सुटली तरी भाव, विचार व कल्पना हयातील सुसंगती ती कधीच नष्ट होवू देत नाही. तुकोबांच्या कवितेत अंगभूत कलात्मक औचित्य आढळते. तुकोबांची कविता ही संतचळवळीत सर्वाधिक लोकांना आपल्या जवळची कविता वाटते.

लोकजीवनाशी लोकभाषेसह तुकोबांच्या काव्यात घनिष्ठ संबंध असल्यामूळेच तुकोबांची कविता सर्वच दृष्टीने लोकसमाजाची कविता ठरते. प्रत्येक माणसाला आकर्षित करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. तुकोबांची कविता ही थोर अनुभाविकाची आणि विचारवंताची भावकविता आहे. तुकोबांच्या कवितेत थोडक्या आणि अर्थपूर्ण शब्दात अनेक विश्वव्यापक सत्ये व्यक्त करण्याची शक्ती आहे.अनुभवांच्या स्वाभाविकतेमूळे तिच्यात रोखठोकपणा आलेला आहे. तुकोबांचे अभंग मराठी मनाला भिडतात, कारण ते खरेखुरे हृदयाचे बोल आहेत. विलक्षण सरलत्व, परिचित प्रतिमासृष्टी, लोकभाषेतील उपमा– दृष्टांत, लोभाषेतीलच शब्दांची निवड आणि भाषेच्या लयीसुद्धा लोकजीवनाला परिचित असल्यामूळे तुकोबांची कविता ही लोककविता झालेली आहे.

तुकारामांच्या अभंगातील एक विशेष म्हणजे मानवी प्रपंचातील हास्यरस त्यांनी जागोजाग टिपला आहे. प्रापंचिकांचा, विषयी जनांचा, लोभी व दांभिक यांचा उपहास करतांना त्यांनी हास्यविनोद निर्माण केला आहे. पंढरपूरला जाणारी सासू आपल्या सूनेला संसारातील कोणकोणत्या गोष्टी सांभाळायच्या ते सांगून, जास्त जेवू नकोस, फार खर्च करू नकोस, हे सर्व सांगते; व शेवटी वेशीपासून घरी येते; आणि 'मुले लेकरे घरदार । माझे येथेचि पंढरपूर ।' असे म्हणते. यात म्हाताऱ्या माणसांनासुद्धा सांसराची माया सुटत नाही, हे मोठया परिणामकारक रीतीने सांगितले आहे.

माणसाचा स्वभावधर्म काही केले तरी सूटत नाही, हे सांगतांना गाढवाला कितीही शृंगारले तरी त्याचे घोडे होत नाही, किंवा कुत्र्याला पालखीत बसविले तरी त्याचे भुंकणे काही थांबत नाही, ही उदाहरणे तुकोबांनी दिली आहेत. एका क्षुद्र गोष्टीसाठी फार मोठी गोष्ट आपण गमावतो. म्हणजे जे कोणी संसारात

गुंतून परमार्थ सुखाला व परमेश्वराला आचवतात त्यासाठी पोपट नळीला धरून राहतो, माकडाचे हातही फुटाणे धरण्यात गुंततात, याचा दाखला त्यांनी दिला आहे. त्याप्रमाणे जी व्यक्ती मोक्षाला अधिकारी नाही, अशा मनुष्याला परमार्थाचा उपदेश करू नये; तो वाया जातो व आपणांस मात्र श्रम होतात. हे सांगतांना कावळयाला मोत्याची माळ घातली तर ती त्याला शोभून दिसेल काय? हत्तीला कस्तुरीचा लेप दिला अथवा बगळयाला उपदेश केला तर या गोष्टी व्यर्थ होतात. अशी उदाहरणे दिली आहेत.

तुकोबांची कविता ही श्रोत्याला आपल्या काव्यजाणीवेतून कधीच मुक्त करीत नाही. आपल्या प्रभावाच्या आणि अनुभवसत्याच्या बळावर, ती श्रोत्याच्या मनावर कमालीचे वर्चस्व निर्माण करते. श्रोता देहभान आणि अहंभाव हरवून बसतो. तुकोबांच्या अवस्थेत पोहचण्याचा तो प्रयत्न करतो.तुकोबांच्या कवितेची पकड ही पोलादी आहे, ती सुटता सुटत नाही. तुकोबांच्या कवितेत उपमा, रूपक आणि दृष्टांत भरपूर आहेत. तुकोबा निखालस बुद्धीवादी संत होते. धार्मिक अवडंबर दूर करून, समाजाला सत्यज्ञानाचा प्रकाश देणे, हेच त्यांच्या कवितेचे ध्येय होते. एखादी गोष्ट समाजाला नीट समजावून सांगण्यासाठी उपमा, दृष्टांत आणि रूपक हे अलंकार अत्यंत उपयोगी ठरतात, ही बाब तुकोबांना चांगल्याप्रकारे ज्ञात होती.

तुकोबांनी कविता लिहावी म्हणून कधी कविता लिहली नाही, हे तुकोबांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्टये आहे.कवी म्हणून तुकोबांना लौकिक नको होता आणि कवी म्हणून तुकोबा निर्मितीपासून कमालीचे अलिप्त असल्याचे दिसतात. त्यांना रोजच्या जगण्याचा अनुभव म्हणून त्यांची काव्यनिर्मिती ही सहजोद्‌गारातून होतांना दिसते. जीवनातील सत्याचा शोध घेणे, हाच तुकोबांच्या काव्याचा धर्म आहे. कवी म्हणून तो एक असतेपणाचा भाव असतो, तोही तुकोबांनी जाणीवपूर्वक टाळला आहे.

तुकोबांच्या कवितेचा विचार करतांना मात्र नैतिकतेला नजरेआड क.रून काव्याचे मूल्यमापण करता येत नाही. तुकोबांचे व्यक्तीमत्व आणि तुकोबांची कविता हया अद्वैताचा विचार करूनच तुकोबांच्या काव्याचा आस्वाद घेता येतो. तुकोबांच्या काव्याचे मूल्यमापणही करता येते. हेच तुकोबांचे महाकवी म्हणून इतर महाकवींपेक्षा वेगळेपण आहे. तुकोबा आणि त्यांची कविता विलगपणे कधीच आस्वादता येत नाही. तुकोबांच्या प्रत्येक अभंगात तुकोबा असतातच. तकोबांच्याशिवाय कधीच तुकोबांची कविता आकाराला येत नाही. तुकारामांच्या अभंगात सर्वत्र आढळणारी 'तुका म्हणे' ही आत्ममुद्रा त्यांची साक्ष आहे.

तुकोबांचे लिहिणे मोठे सुत्रबद्ध असते. थोडया शब्दात मोठा अर्थ सांगण्याचे सामर्थ्य तुकोबांच्या वाणीत आहे. यामूळेच तुकोबांच्या कित्येक वचनांना सुभाषितांचा अर्थ प्राप्त झाला आहे. त्यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

१. तुका म्हणे संत । सोशी जगाचे आघात ।

२. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

३. जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले<br>तोचि साधू ओळखावा । देव तेथिचि जाणावा ।।

४. गाढव शृंगारले कोडें । काही केल्या नव्हे घोडे

५. साधूसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा

या म्हणीवजा सुभाषितात प्रपंच, परमार्थ, काव्य सर्व काही आहे. वाणीतील भेदकता, बुद्धीचे स्वातंत्र्य व अंतरीचा प्रत्यय या तीन गुणांमूळे तुकोबांचे काव्य श्रेष्ठ ठरले आहे. स. कृ. जोशी यांच्या 'तुका झालासे कळस' या पुस्तकात श्रीकृष्ण के. क्षीरसागर आपल्या प्रस्तावनेत म्हणतात,'आमच्या सर्व संतकवींत तुकाराममहाराजांचे स्थान असाधारण आहे. काव्य या दृष्टीने तुकाराममहाराजांच्या अभंगांचे स्थान ठरविणे थोडे

अवघड असले, तरी ज्याला अस्सल धारदार मराठी प्रयोग आपल्या जिव्हाग्नी बसावा असे वाटत असेल, त्याने 'तुकयाची अभंगवाणी' आत्मसात करावी असे मी म्हणेन'.

तुकारामांनी काव्याच्या संदर्भात अनुभूतीचे महत्व जागोजागी वर्णिले आहे. अनुभवामुळे काव्यास जिवंतपणा येतो. तुकारामांच्या काळात नव्हे तर आजही सामान्यांच्या तोंडून 'तुका म्हणे' हा अभंग सहजगत्या बाहेर पडतो. कारण तुकाराम महाराष्ट्राचे म्हणजे महाराष्ट्रातील बहूजन समाजाचे खरेखुरे प्रतिनिधी होते. त्यामूळे त्यांचे जीवन काव्यात प्रतिबिंबित झालेले आहे. म्हणून तुकारामांच्या वचनांचा प्रत्यय व पडसाद त्यांच्या अंत:करणात ताबडतोब उठतो, आणि ती वचने त्यांच्या अंत:करणात ठसून जातात. म्हणूनच इतर कोणत्याही संतकवीपेक्षा तुकाराम आणि तुकारामांची अभंगवाणी अधिक लोकप्रिय आहे; आणि मराठी भाषा व मराठी मन कायम आहे तोपर्यंत ती अशीच अभंग राहील यात शंका नाही.

**निष्कर्ष :—**

१. संत बहिणाबाईने ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला तर त्याचा कळस तुकारामांनी चढविला, असे तिने सार्थपणे म्हटले आहे.
२. तुकाराम हे जसे श्रेष्ठ संत होते, तसेच ते असामान्य प्रतिभेचे कवीही होते.
३. तुकोबांची कविता ही श्रेष्ठ भावकविता असून मानवी जीवनाच्या समग्रतेला आपल्या कवेत घेणारी आहे.
४. लोकजीवनाशी लोकभाषेसह तुकोबांच्या काव्यात घनिष्ठ संबंध असल्यामूळेच तुकोबांची कविता सर्वच दृष्टीने लोकसमाजाची कविता ठरते.
५. तुकोबांच्या कवितेचा विचार करतांना मात्र नैतिकतेला नजरेआड करून काव्याचे मूल्यमापण करता येत नाही.
६. थोडया शब्दात मोठा अर्थ सांगण्याचे सामर्थ्य तुकोबांच्या वाणीत आहे.

**संदर्भ टीपा :—**

१. नेमाडे भालचंद्र — तुकाराम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. द्वितीयावृत्ती. १९९७. प्रस्ता.
२. जगनाळे डॉ. रेखा — संतकवयित्री जनाबाई काव्यदर्शन, विजय प्रकाशन, नागपूर. ऑक्टो. २००९ प्रस्ता.
३. जोशी डॉ. मधुकर रामदास — सिद्ध परंपरा आणि महाराष्ट्रातील संत, विजय प्रकाशन, नागपूर. २००२
४. पिंगे डॉ. श्री.म., माळी गजमल — तुकारामांचे निवडक १०० अभंग, व्हीनस प्रकाशन, पुणे. आवृत्ती सातवी २०१७
५. सानप डॉ. किशोर — समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर. संत तुकाराम चतुर्थ जन्मशताब्दी वर्ष, २००८
६. जोशी स. कृ. — तुका झालासे कळस, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे. चौथी आवृत्ती २०००